॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२३-२४/४४६२ दिनांक : २२/०४/२०२४

अत्यंत तातडीचे

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: उन्हाळी-२०२४ परीक्षेतील सर्व अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करणेसाठी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना त्वरीत कार्यमूक्त करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२४ परीक्षेतील सर्व पदवी/पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सदर पदवी/पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील नियमीत शिक्षकांना मूल्यांकनाच्या कार्यासाठी विद्यापीठाकडून प्राचार्यामार्फत पत्र पाठविण्यात आलेले आहेत. सदर पत्राच्या अनुषंगाने सर्व संबंधीतांना त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावेत.

तसेच करार/तासिका तत्वावरील किमान शिकविण्याचा अनुभव असणा-या शिक्षकांना, संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांच्यास्तरावर पत्र देवून मूल्यांकनाच्या कार्यासाठी संबंधीत मूल्यांकन केंद्रावर रुजू होणेसाठी कार्यमुक्त करावे.

उन्हाळी-२०२४ परीक्षेदरम्यान सहकेंद्रप्रमुख/दक्षता पथकाचे कार्य करण्यासाठी किमान तीन ते चार शिक्षकांची नावे पाठविण्यासाठी विद्यापीठाव्दारे दोन ते तीन वेळा कळवूनही काही प्राचार्याकडून सदर पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही केल्याचे दिसून आलेले नाही. अशा सर्व प्राचार्याकडून खुलासा घेण्याबाबत मा.कुलगुरू महोदयांनी आदेशीत केले आहे. ज्या प्राचार्यांचा सहकेंद्रप्रमुख/दक्षता पथक नामनिर्देशनाबाबतचा सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. यापध्दतीची कार्यवाही मूल्यांकन करण्यासाठी शिक्षकांना कार्यमूक्त न केलेल्या प्राचार्यांवरही कार्यवाही करणेबाबत मा.कुलगुरू महोदयांनी आदेशीत केले आहे.

सबब, मूल्यांकनाचे कार्य करणेसाठी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना कोणतेही कारण न सांगता त्वरीत कार्यमूक्त करून सदर कार्यवाहीचा कार्यअहवाल दिनांक २४/०४/२०२४ रोजीपर्यंत परीक्षा विभागाच्या srtmuncoordinationsection@gmail.com या मेलवर साादर करण्यात यावा, ही विनंती.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:**

सर्व समन्वयक, जिल्हा/तालुका मूल्यांकन केंद्र, उन्हाळी परीक्षा-२०२४ यांना देवून कळविण्यात येते की, वर करळविण्यात आल्याप्रमाणे कार्यमूक्त केलेल्या शिक्षकांना मूल्यांकनासाठी रुजू करुन घेण्यात यावे, रुजू न झालेल्या शिक्षकांची माहिती परीक्षा विभागास त्वरीत कळविण्यात यावी. तसेच मूल्यांकन केंद्रावरती इतर ठिकाणच्या जास्तीच्या विषय शिक्षकांची आवश्यकता असल्यास आपल्यास्तरावरती आपल्या परिसरातील महाविद्यातील प्राचार्याच्या समतीने आवश्यक त्या शिक्षकास पत्राव्दारे बोलावून मूल्यांकनाची कार्यवाही वेळेत करावी. तसेच उन्हाळी-२०२४ च्या परीक्षेचा निकाल वेळेत लावणेसाठी सहकार्य करावे ही विनंती.जीम